# मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडेच वडाळा-सीएसएमटी मेट्रो

## ७० टक्के भुयारी मार्ग

## ३० टक्के मार्ग एलिव्हेटेड

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्याबरोबरच वाढत्या प्रदूषणावर मात करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेशांतर्गत मेट्रो रेल्वेचे जाळे निर्माण करण्यात येत आहे. त्याअंतर्गत वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मेट्रो रेल्वेमार्ग तयार करण्यात येणार आहे. मुंबईतील इतर मेट्रो प्रकल्पांप्रमाणेच या प्रकल्पाचे कामही मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला देण्याचा निर्णय राज्याच्या नगर विकास खात्याने घेतला आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनमार्फत उभारण्यात येणारा कुलाबा- वांद्रे-सीप्झ हा सुमारे ३३ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग आहे. ही मेट्रो रेल्वे वर्दळीच्या भागातून जाणार असल्याने हा मार्ग पूर्णपणे भूमिगत आहे. याच धर्तीवर वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हा मेट्रो मार्ग ११ उभारण्याचा निर्णय पूर्वीच घेतला आहे. हा मेट्रो मार्ग सुमारे मार्ग १२ किमी लांबीचा आहे. कुलाबा-वांद्रे ते सीप्झ या मेट्रो तीनच्या मार्गाप्रमाणे वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हा मेट्रो मार्ग ११ वर्दळीच्या भागातून जाणार आहे. त्यामुळे हा मार्गही भुयारी करण्यात येणार आहे. त्यातील वडाळा ते शिवडी हा चार किमीचा मार्ग उन्नत (एलिव्हेटेड) आणि उर्वरित शिवडी ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हा सुमारे ८ कि.मी. लांबीचा भुयारी आहे. म्हणजे जवळ जवळ ७० टक्के मेट्रो मार्ग भुयारी आहे.



राज्यात मेट्रो रेल्वेसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात भुयारी मेट्रो मार्ग उभारण्याचा अनुभव मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडे आहे. त्यामुळे शिवडी ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हा मार्गही मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मागील आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रो मार्ग २ 'अ' आणि मेट्रो मार्ग ७ (टप्पा दोन)चे लोकार्पण झाले होते.